# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. महासभा दि.१८/०७/२०१९

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.१३४:- **हटकेश जंक्शन येथील नाला छेदून केसिंग पाईप एच.डी..डी. पद्धतीने टाकणे व ११५४ मि.मी.,९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

मिरा-भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील हाटकेश या ठिकाणी चार रस्त्यांचे जंक्शन आहे. सदर ठिकाणी मुख्य जलवाहिन्या फुटपाथला लागून आहेत. त्यामुळे रस्ताची रुंदी कमी होत आहे. सदर रस्ताच्या रुंदीकरणाचे काम बांधकाम विभागामार्फत काम प्रस्तावित आहे. त्यामुळे सदर मुख्य जलवाहिन्या नाला छेदून केसिंग पाईप एच.डी..डी. पद्धतीने टाकणे व ११५४ मि.मी.,९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे काम करणे आवश्यक आहे. सदर मुख्य जलवाहिन्या स्थलांतरीत केल्यामुळे संबंधित ठिकाणी असलेले रस्त्याचे चार रस्त्यांचे जंक्शनच्या रुंदी वाढण्यास मदत होणार आहे.

सदर कामी रक्कम रु.१,५४,१६,५८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**